# परिशिष्ट

परिशिष्ट - १



कथाकार विलास सिंदगीकर



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## परिशिष्ट - २

## अल्पपरिचय

- संपूर्ण नाव : विलास कोंडीबा सिंदगीकर
- जन्मगाव : केकत सिंदगी, पो.ता.जळकोट, जि.लातूर-४१३५३२
- जन्म तारीख : ०५-०६-१९७० (अंदाजे)
- शिक्षण : एम.ए., बी.एड्.(इंग्रजी)
- व्यवसाय : मुख्याध्यापक, क्रांती माध्यमिक विद्यालय, केकत सिंदगी पो.ता.जळकोट, जि.लातूर-४१३५३२
- **विलास सिंदगीकर यांची पुस्तके :**

  १. 'भूकबळी' (कथासंग्रह) - २००३

  २. 'गारपीट' (कथासंग्रह) - २००५

  ३. 'उतरंड' (कथासंग्रह) - २००८

  ४. बहुजनाचे महानायक : अण्णाभाऊ साठे (स्मरणिका-सहसंपादन) - २००३

  ५. 'ढगा ढगा धाव रे (बाल कवितासंग्रह) - २००९

  ६. 'गीत निळ्या आकाशाचे' (कविता संग्रह) - २००९
- **साहित्यास मिळालेले पुरस्कार :**

  १. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचा ज्येष्ठ साहित्यिक बाबुराव बागूल गौरव पुरस्कार (भूकबळी)

  २. भि.ग.रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार, कोपरगाव, जि.अहमदनगर (गारपीट)

  ३. सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील वाङ्मय पुरस्कार, तरवडी, जि.अहमदनगर (भूकबळी)

  ४. लोकानुकम्पा साहित्य पुरस्कार, नागपूर (भूकबळी / गारपीट)

  ५. समाजप्रबोधन वाङ्मय पुरस्कार, नागपूर (भूकबळी / गारपीट)

  ६. श्री.चक्रधर स्वामी साहित्य पुरस्कार, शेवाळी, जि.हिंगोली (गारपीट)

७. स्व. बाजीराव पाटील अंकुर साहित्य पुरस्कार, अकोला (गारपीट)

८. शब्दगंध वाङ्मय पुरस्कार, अहमदनगर (गारपीट)

९. अण्णाभाऊ साठे वाङ्मय पुरस्कार, आंदेगाव जि. नांदेड (भूकबळी / गारपीट)

१०. पू.साने गुरूजी सा.वाचनालय कुंटुर, जि.नांदेड कै.गंगाबाई मामीडवार वाङ्मय पुरस्कार (गारपीट)

११. मास्टर दिनानाथ मंगेशकर महाविद्यालय, औराद शहाजानी जि.लातूरचा कै.प्रा.लक्ष्मण दांडेकर साहित्य पुरस्कार (गारपीट)

१२. परिवर्तन वाङ्मय पुरस्कार, नळदुर्ग, जि.उस्मानाबाद (भूकबळी)

१३. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा भूषण वाङ्मय पुरस्कार, औरंगाबाद (भूकबळी)

१४. बहुजन विश्वसेवा संघाचा अण्णा भाऊ साठे समाज गौरव पुरस्कार, अंबरनाथ (पू) जि.ठाणे (गारपीट)

१५. कै.शेषाकाकू भंडे-पाटील उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार, दावणगाव ता.उदगीर, जि.लातूर (उतरंड)

१६. कै. अमृतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालय, नायगाव बाजारचा कै.बळवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार, नायगाव बाजार जि.नांदेड (उतरंड)

- **विशेष :**

१. अखिल भारतीय साहित्य अकादमी, दिल्ली प्रादेशिक कार्यालय, मुंबईची साहित्य अकादमी प्रवासवृत्ती प्रदान (२००८)

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादच्या मराठी विभागाने एम.ए. द्वितीय वर्षासाठीचा अभ्यासक्रमात 'गारपीट' ह्या कथासंग्रहाचा समावेश.

३. मराठवाडा साहित्य परिषद औरंगाबादच्यावतीने 'स्वागत' या सांस्कृतिक साहित्यविषयक कार्यक्रमात नव्या उम्मेदीने लेखन करणारे परिवर्तनवादी लेखक म्हणून गौरव (३ सप्टेंबर २००४)

४. म.सा.प.शाखा जळकोटचे कार्यवाह म्हणून पदभार (१ मे २००४)

५. मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबादच्या मराठी विषय परीक्षा समितीच्या सदस्यपदी निवड (एप्रिल २००७ पासून)

# परिशिष्ट - ३

## साहित्यिक विलास सिंदगीकर यांची मुलाखत : दि. २०-३-२०१०

**प्रश्न. १ सर तुम्ही कोणाच्या तत्त्वज्ञानाच्या आधारावर लेखणाची प्रेरणा घेतली आहे ? त्यामध्ये कोणाला प्रेरणास्थानी मानता?**

१५ ऑगस्ट १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळालं, आणि लोकशाही मूल्याधिष्ठित समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुत्व यावर आधारित शासन पद्धती सुरू झाली. शिक्षण नाकारलेले समुह ज्ञानसूर्यात प्रकाशयान झाले. हाती लेखणी घेऊन अज्ञानाचा आणि दारिद्र्याचा नायनाट करण्यासाठी प्रकाशयात्री बनले. आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक सर्वच क्षेत्रात कुचंबना, दबलेपण, शोषण, आत्याचारित, अपमानीत जीणं उद्रेकासारखं प्रगट झालं. हजारो वर्षे थंड गोळ्यागत अचेतन पडलेल्या समाजमनात चैतन्य निर्माण झालं ही सारी किमया डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले, छ. शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, म. विठ्ठल रामजी शिंदे आणि अण्णाभाऊ साठे आदी महापुरूषांच्या विचार व कार्य स्फुलिंगामुळे झाली.

म. गौतम बुद्धांनी जडवादी तंत्त्वज्ञान जगाला दिले. म. फुलेंनी समाजात नव समता प्रस्थापित केली. म. फुलेंनी समाजात नव समता प्रस्थापित केली. राजर्षि शाहूंनी आरक्षणाच्या माध्यमातून नवी सामाजिक अभिसरणाची क्रिया घडवून आणली. अण्णाभाऊ साठेंनी साहित्यातून नव गुलामी झुगारण्याचे बळ असणारे बहुजन समाजातील गरीब माणसांना नायक बनवले, पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे त्यांच्या कार्याच्या स्पर्शाने आंधळ्याला दृष्टी आली, मुक्याला वाचा फुटली, आणि लंगडा चालू लागला. आणि खऱ्या अर्थाने हजारो वर्षापासूनचा गुलाम मनुच्या जोखडातून मुक्त झाला.

म. गौतम बुद्ध, म. फुले आणि संत कबिर यांना गुरू मानून डॉ. बाबासाहेबांनी आपले मानव मुक्तीचे कार्य केले. गावकुसाबाहेर फेकून दिलेला आणि कुत्र्या-मांजरापेक्षाही वाईट अवस्थेत जगणाऱ्या दलित समाजाच्या उद्धारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले होते. 'दलितांना माणसासारखे वागवा' याच एका भूमिकेतून आंबेडकरांनी आपली मानवमुक्तीची चळवळ उभी केली. त्यांनी दलित-बहुजन उद्धारासाठी

अत्यंत मोलाचे कार्य केले त्यामुळे ते मला प्रेरणास्थानी वाटतात. माझा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीवर त्यांनी घेतलेल्या भूमिकांवर आणि लिहिलेल्या अक्षरांवर दृढविश्वास आहे. या देशातील वर्णव्यवस्था, विषमता आणि जाती, धर्मवाद नष्ट करण्याचे आंबेडकरी तत्त्वज्ञान हाच एकमेव उपाय आहे. या निकषाला मी आलो आहे. म्हणून मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अफाट विद्वत्तेला तत्त्वज्ञानाला शरण गेलो आहे.

**प्रश्न. २ परिवर्तनवादी चळवळीतील एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून तुम्ही कोणकोणती कार्य केली आहेत?**

नागपूरच्या दीक्षा भूमीवर डॉ.आंबेडकर यांच्याकडून ज्यांनी बौद्धधम्माची दीक्षा घेतली ते धन्य आहेत.मला वाईट वाटते की, मी १९५६ ला नव्हतो. त्यामुळे त्यावेळी मी जरी बाबासाहेबांकडून धम्मदीक्षा घेऊ शकलो नाही. तरी त्यांनी लिहिलेल्या ग्रंथाच्या पाना-पानांतील अक्षरा-अक्षरांतून मी समतेची, स्वाभिमानाची दीक्षा निश्चितच घेतली आहे. म्हणूनच मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या लढाईत मीही मला जमेल तसा माझ्या शक्तीनुसार लढलो आहे.

मराठवाड्यातील अनेक गावामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे यांची पहिली जयंती चालू करण्याचे कार्य.

सामाजिक मेळावे, परिषदा, सामाजिक प्रश्नावर मोर्चे, राज्यस्तरीय आंबेडकरी विद्रोही कवीसंमेलनाचे यशस्वी आयोजन, तसेच नामांतर चळवळीत ज्या जळकोट येथे फौजदार गोविंद भूरेवार यांना जीवंत जाळले. त्याच गावात १ ले अ.भा. अण्णा भाऊ साठे साहित्य संम्मेलनाचे यशस्वी आयोजन करून नवीन परिवर्तन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

घिसाडी, फासेपारधी समाजातील शाळाबाह्य गरीब मुलांना शाळेच्या प्रवाहात आणण्याचे कार्य स्त्री मुक्ती चळवळीतही काम करीत आहे.

**प्रश्न.३ सामाजिक परिवर्तनवादी चळवळीमध्ये सहभागी होण्यामागची तुमची भूमिका कोणती?**

या देशाला स्वातंत्र्य मिळून साठ वर्षे उलटली आहेत, पण बहुजन समाजाचे प्रश्न संपलेली नाहीत. ती नव्या रूपाने उग्ररूप धारण करीत समोर येत आहेत. श्रीमंत हा

श्रीमंत होत आहे, आणि गरीब हा गरीब होत आहे. खाऊजा धोरणामुळे इथला गरीब नागवला जाणार आहे, नव्हे नागवला जातो आहे. खाजगीकरणाच्या माध्यमातून बहुजन समाजाचे हक्क नाकारले जात आहेत. इथल्या बहुजन समाजाला आणि कोणत्याही जातीधर्मातील स्त्री असो, त्यांना न्याय मिळावा, त्यांना सुखाचे दिवस जगता यावेत. त्यासाठी साहित्य लेखनाबरोबर सामाजिक चळवळीत काम करीत आहे. ही माझी निखळ व पारदर्शी भूमिका आहे. त्यामागचे मुख्य प्रेरणास्थान म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय.

## परिशिष्ट - ४

## साधन सूची


१. सिंदगीकर, विलास - 'भूकबळी', केदार ऑफसेट, उषाकिरण टॉकीज मागे, कैलास नगर, लातूर, प्रथमावृत्ती २१ एप्रिल २००३.

२. सिंदगीकार, विलास - 'गारपीट', संगत प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती २८ नोव्हेंबर २००५.

३. सिंदगीकार, विलास - 'उतरंड', संगत प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती मार्च २००८.


## परिशिष्ट - ५


१. औचरमल, प्रा. डॉ. एल. वाय. - 'आंबेडकरवादी साहित्य आणि इतिहास पद्धत', वैभव प्रकाशक मंडळ, उल्हासनगर प्रथम आवृत्ती-२ जाने २००१ .

२. कटारे, मोतीराम - 'फुले आंबेडकरी साहित्य : आकलन आणि आस्वाद', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद प्रथमावृत्ती - जुलै २००६.

३. कटारे, मोतीराम - 'मूल्यशोध', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद आवृत्ती पहिली, डिसेंबर २०००.

४. किरवले, डॉ. कृष्णा - 'समग्र लेखक बाबुराव बागुल', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती - नोव्हेंबर २००२.

५. किरवले, डॉ. कृष्णा - 'दलित चळवळ आणि साहित्य', मॅजिक प्रकाशन, पुणे, ३० आवृत्ती प्रथम-जून १९९६.

६. कुलकर्णी, व.दि. - 'मराठी साहित्य : विमर्श आणि विमर्शक', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती-२३ ऑगस्ट २००१ ऋषिपंचमी.

७. खरात, शंकरराव - 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर', इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण डॉ.बाबासाहेब आंबेडकर, जन्मशताब्दी वर्ष १५ मे १९९०.

८. खंडेराव, हरीश - 'आंबेडकरवादी साहित्य : जाणिवा आणि मानसिकता', प्रज्ञा प्रकाशन, पहिली आवृत्ती, एप्रिल २००४.

९. डांगळे, अर्जून - 'दलित विद्रोह', ग्रंथघर द्वार ग्रंथाली, पहिली आवृत्ती - २७ सप्टेंबर १९९१.

१०. देशपांडे, बालशंकर - 'कादंबरी विवेचन आणि विश्लेषण', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती - १ ऑक्टो. १९९८ विजयादशमी

११. पाटील, म.सु. - 'साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर पहिली आवृत्ती, जुलै २००१.

१२. पाटील, मोहन - 'ग्रामीण साहित्य आणि संस्कृती', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली-जुलै-२००२.

१३. मुलाटे, डॉ. वासुदेव - 'साहित्य, समाज आणि परिवर्तन', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती, शिक्षक दिन, ५ सप्टेंबर २००७.

१४. मेश्राम, केशव - 'साहित्य-संस्कृती मंथन', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती ऑगस्ट २००४.

१५. हातकणंगलेकर, म.द. - 'मराठी कथा रूप आणि परिसर', सुपर्ण प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती मार्च, १९८६.

१६. सांगोलकर, डॉ.अविनाश - 'दलित साहित्य प्रवाह आणि प्रकार', प्रतिमा प्रकाशन, पुणे प्रथमावृती ६ डिसेंबर २००८ शनिवार, (डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन)

१७. यादव, आनंद - 'ग्रामसंस्कृती दशा आणि दिशा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, पुर्नमुद्रण - जुलै, २००४.

१८. यादव, डॉ.आनंद - 'मराठी साहित्य समाज आणि संस्कृती', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, द्वितीयावृत्ती - जुलै, १९९३.

891.462
Pat
T16119